**कृपया प्रसिध्दीसाठी** **25 नोव्हेंबर 2012**

# इथेनॉल मिश्रित पेट्रोल पुन्हा सुरु होणार

*कुंभकर्णाच्या झोपेतून जागे झाल्याबद्दल सरकारचे अभिनंदन - राम नाईक*

**मुंबई, रविवार :** ''पेट्रोलियम पदार्थांसाठीचे परराष्ट्रांवरील अवलंबित्व कमी करण्याच्यादृष्टीने पुन्हा एकदा इथेनॉल मिश्रित पेट्रोल पुरवठा सुरु करण्याच्या काँग्रेस सरकारच्या निर्णयाचे स्वागतच केले पाहिजे. परंतु वाजपेयी सरकारने राष्ट्रहितार्थ सुरु केलेली ही योजना सत्तेवर येताच 2004 मध्ये तडकाफडकी कुणाच्या दबावामुळे बासनात गुंडाळली हा कळीचा मुद्दा आहे. आठ वर्षांच्या कुंभकर्णाच्या झोपेतून जागे होऊन या निर्णयाची पुन्हा अंमलबजावणी होणार आहे हेही नसे थोडके,'' अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली आहे. केंद्रिय मंत्रिमंडळाच्या आर्थिक निर्णय घेणा-या समितीने पुन्हा इथेनॉलमिश्रित पेट्रोल पुरवण्याचा जो निर्णय जाहीर केला त्यावर श्री. नाईक बोलत होते.

श्री. राम नाईक यांनी ते पेट्रोलियम मंत्री असताना पेट्रोलमध्ये 5 टक्के इथेनॉल मिसळण्याच्या योजनेचा 1 जानेवारी 2003 रोजी प्रारंभ केला होता. वाजपेयी सरकारने देशातील आठ राज्यांमध्ये पेट्रोल पुरविण्यास सुरुवात केली. भविष्यात देशभर हा पुरवठा करण्याची तसेच इथेनॉलचे प्रमाण दहा टक्क्यांवर नेण्याची योजनाही जाहीर केली होती. हा निर्णय जसा पेट्रोलियम क्षेत्रात क्रांतिकारक ठरला तसाच ऊसउत्पादक शेतक-यांसाठीही वरदान ठरला. ऊसाच्या मळीपासून इथेनॉल तयार होत असल्याने शेतक-यांना तो संजीवनीच वाटला. मात्र देशातील लिकर लॉबी नाराज झाली. दारु उत्पादनासाठी कमी भावात मळी मिळेनाशी झाली. या लॉबीच्या दबावापुढे न झुकता राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी केली. मात्र काँग्रेसने सत्तेवर येताच ही संपूर्ण योजनाच रद्द केली. यामुळे पेट्रोलियम पदार्थांची आयात 80 टक्क्यापर्यंत वाढली. ऊस उत्पादक शेतकरी पुन्हा नागले जाऊ लागले, नव्याने उभे राहिलेले अनेक उद्योगधंदे बंद झाले. देशाचे नुकसान करणारा हा निर्णय काँग्रेस सरकारने का घेतला व गेली आठ वर्षे ही स्थिती कायम का ठेवली याचे उत्तर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी दिले पाहिजे अशी मागणीही यावेळी श्री. राम नाईक यांनी केली.

पुन्हा एकदा इथेनॉल मिश्रित पेट्रोल सुरु होणार ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. मात्र इथेनॉलची योग्य किंमतही सरकारी तेल कंपन्यांनी दिली पाहिजे तरच योग्य पुरवठाही होईल. पेट्रोल उत्पादन खर्चाच्या थोडीशीच कमी किंमत ठेवली पाहिजे. तसे झाले तरच ऊस उत्पादक शेतकरीही उत्साहाने कोणत्याही दबावाला बळी न पडता पुरवठा करतील, देशाची पेट्रोलियम पदार्थांची आयात लक्षणीय कमी होईल, असे मत श्री. राम नाईक यांनी व्यक्त केले. ''पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाण आगामी काळात 10 टक्क्यापर्यंत वाढविण्याचाही सरकारने निर्णय घेतला पाहिजे,'' असेही यावेळी श्री. नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**